सं.फौ.ख.क्र. ११६५/२०१९
निशाणी क. ३२ च्या पुढे

<u>**पुढील सरतपास फिर्यादीतर्फे वकील अॅड श्री ए. बी. घोगरे यांचे मार्फत शपथेवर.**</u>

७. आता मला दिनांक ०१/०८/२०१९ रोजीचा आय.सी.आय.सी.आय. बॅक, शाखा भवानीनगर रक्कम रूपये १,००,०००/— करिता आरोपीने दिलेला धनादेश क. ००५४९३ दाखविण्यात आला, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर आरोपीची सही आहे, मी सही ओळखतो, त्यास **निशाणी क. ३५** देण्यात येते. आता मला दिनांक ०१/०८/२०१९ रोजीचा आय.सी.आय.सी.आय. बॅक, शाखा भवानीनगर रक्कम रूपये १,००,०००/— करिता आरोपीने दिलेला धनादेश क. ००५४९४ दाखविण्यात आला, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर आरोपीची सही आहे, मी सही ओळखतो, त्यास **निशाणी क. ३६** देण्यात येते. आता मला सदरचे दोन्ही धनादेश भरणा केलेची दिनांक १५/१०/२०१९ रोजीच्या पावत्या दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. त्यावर बॅकेचा सही व शिक्का आहे. त्यास **अनुक्रमे निशाणी क. ३७** आणि **निशाणी क. ३८** देण्यात येते. आता मला सदरचे दोन्ही चेक न वटता परत आल्याने दिनांक १९/१०/२०१९ रोजीचे दोन चेक रिटर्न मेमो दाखविण्यात आले. त्यावर बॅकेचा सही शिक्का आहे. त्यावरील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **अनुक्रमे निशाणी क. ३९** आणि **निशाणी क. ४०** देण्यात येते. अॅड. श्री. ए. बी. घोगरे यांच्यामार्फत दिनांक १६/११/२०१९ रोजी सदरची मागणी नोटीस आरोपीस पाठविण्यात आली. आता मला सदर मागणी नोटीसीची ऑफिस स्थळप्रत दाखविण्यात आली, त्यावर माझी व वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **निशाणी क. ४१** देण्यात येते. सदरची मागणी नोटीस आरोपीने स्विकारली नसल्याने परत आलेली आहे.

(सदर मागणी नोटीसीचा बंद लिफाफा न्यायालयात उघडण्याची फिर्यादी यांच्या वकीलांनी परवानगी मागितली. त्याप्रमाणे परवानगी देण्यात आली. सदरचा बंद लिफाफा फिर्यादी, फिर्यादी यांचे वकील आणि आरोपी यांच्या वकीलांच्या उपस्थितीत उघडण्यात आला.)

८. आता मला सदरच्या बंद लिफाफ्यातील नोटीस दाखविण्यात आली. ती तीच आहे. बंद लिफाफा, नोटीस आणि पोहोच पावती यास **एकत्रात निशाणी क. ४२**

**सं.फौ.ख.क्र. ११६५/२०१९**
**निशाणी क. ३२ च्या पुढे**

देण्यात येते. आरोपीने माझ्याकडून खरेदी घेतलेल्या जनावरांचे पैसे देणेकरिता रोख रक्कम नसल्याने नमुद धनादेश देणेबाबत करार केला. त्यावर माझी आणि आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

सरतपास पूर्ण.
(आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.)

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2024.11.28 15:20:23 +0530

ठिकाण इंदापूर (जे. एन. भस्मे)
दिनांक २७/११/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.